राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /६८३/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

अपिलार्थी	उत्तरवादी	
	जन माहिती अधिकारी तथा	प्रथम अपिलीय अधिकारी
लक्ष्मण कान्होजी कोल्हे	पोलीस अधिक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण जि. पुणे	पोलीस अधिक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण जि. पुणे

(सुनावणी दिनांक- १७.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. १२.०२.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हजर आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

माहिती अर्ज दिनांक	माहितीचा तपशील
२५.०५.२०२४	दि. २४.०४.२०२४ च्या पत्रावर काय कार्यवाही केली या बाबत माहिती

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, "माहिती दिली नाही."

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे आयोगाची पुर्वपरवानगी न घेता सुनावणीकामी गैरहजर आहेत ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाला उत्तर/ माहिती दिल्याचे दिसुन येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची ही कृती माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचे उल्लंघन करणारी आहे. या गंभीर निष्काळजीपणाबद्दल आयोगाद्वारे दोघांनाही समज देण्यात येत आहे. भविष्यात प्राप्त होणा-या माहिती अर्जावर व प्रथम अपिल अर्जावर कार्यवाही करताना त्यांनी माहिती अधिकार कायदयातील सर्व संबंधित तरतुदींचे काटेकोरपणे आणि विहीत कालमर्यादेत पालन करावे, अन्यथा त्यांच्यावर कायदयानुसार योग्य दंड आणि शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस प्रस्तावित केली जाईल याची गंभीरपणे नोंद घेणेत यावी.

प्रकरणी अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले नाही.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी पोलीस अधिक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण, जि. पुणे यांनी अपिलार्थीच्या जोडपत्र 'अ' मध्ये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) नुसार व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे आयोगास कोणतीही पुर्वसूचना न देता अथवा पूर्व पुरवानगी न घेता द्वितीय अपिल सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्या विरुध्द शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५)/सहा दि. ०१.१२.२०१५ मधील तरतूदीनुसार कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये? या बाबतचा लेखी खुलासा अपिलार्थीस आयोगाच्या आदेशानुसार माहिती पुरविल्याचे पोहोचसह दि.22/06/२०२६ रोजी समक्ष उपस्थित राहून आयोगास सादर करावा. नमूद दिनांकास उपस्थित राहून खुलासा सादर न केल्यास आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र राहिल याची नोंद घ्यावी.

३. प्रथम अपिलीय अधिकारी पोलीस अधिक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण, जि. पुणे यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ / ६८३/२०२५/पुणे 2639/2026 दिनांक - 8/6/2026.

रामाआ-पुणे/२०२५/NSB